महाराष्ट्र शासन

क्रमांक : एनजीसी-३५८२/७०२२/विशि-२.
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ जून १९८३.

प्रति,

कुलसचिव,

मुंबई विद्यापीठ, मुंबई,
पुणे विद्यापीठ, पुणे,
नागपूर विद्यापीठ, नागपूर,
अमरावती विद्यापीठ, अमरावती,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद,
एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

विषय :- १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांची नवीन महाविद्यालये उघडण्यास परवानगी देण्याबाबत....

महोदय,

१९८३-८४ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनाकडे विद्यापीठाकडून आलेल्या अर्जांचा विचार करून सोबतच्या यादीमध्ये दिलेल्या संस्थांकडून १९८३-८४ पासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता आलेल्या अर्जांवर महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९७४ च्या कलम ४३[४] व [५] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची संबंधित विद्यापीठांना परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

२. शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवरच आहे :-

[१] शासनाकडून वर निर्देशित केलेल्या महाविद्यालयांना ५ वर्षेपर्यन्त कुठलेही अनुदान देण्यात येणार नाही.

[२] ज्या विद्याशाखा उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्या प्रत्येक विद्याशाखेच्या त्रिवर्षीय पदवी परिक्षेच्या पहिल्या

| १. | २. | ३. |
|---|---|---|
| ११. [illegible], पुणे | कला, विज्ञान व वाणिज्य | रयत शिक्षण संस्था, सातारा. |
| १२. पुणे शहर | वाणिज्य | विद्याभवन हायस्कूल, शिवाजी नगर, पुणे. |
| १३. खडकी, पुणे | वाणिज्य | खडकी शिक्षण संस्था, खडकी, पुणे. |
| १४. पिंपरी-चिंचवड जिल्हा पुणे | कला, विज्ञान व वाणिज्य | भारतीय हरिजन गिरीजन समाज, उन्नती मंडळ, भिवंडी, जिल्हा ठाणे. |
| १५. लोणावळा जिल्हा पुणे. | कला व वाणिज्य | लोणावळा एज्युकेशन ट्रस्ट, लोणावळा, जिल्हा पुणे. |
| १६. पिंपळनेर जिल्हा पुणे | वाणिज्य व विज्ञान | पिंपळनेर एज्युकेशन सोसायटी पिंपळनेर, ता. बार्शी, जिल्हा पुणे. |

## शिवाजी विद्यापीठ.

| | | |
|---|---|---|
| १७. सांगली, [रात्र महाविद्यालय] | कला व वाणिज्य | लट्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली. |
| १८. मिरज [फक्त मुलींकरिता] | कला व वाणिज्य | विमेन्स एज्युकेशन सोसायटी, सांगली. |
| १९. मलकापूर, जिल्हा कोल्हापूर | कला व वाणिज्य | कानसाखोरा शिक्षण प्रसारक मंडळ, मलकापूर. |
| २०. इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर | कला, विज्ञान व वाणिज्य | श्री. नारायणराव बाबासाहेब एज्युकेशन सोसायटी, इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर. |

## नागपूर विद्यापीठ

| | | |
|---|---|---|
| २१. नागपूर | कला व वाणिज्य | अमर सेवा मंडळ, नागपूर. |
| २२. अहेरी, जिल्हा चंद्रपूर | कला व वाणिज्य | सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर. |

शासन पत्र, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एनजीसी ३५८३/७०२२/ विशि-४, दिनांक १३ जून, १९८३ चे सहपत्र.

## विवरण पत्र

१९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता तीन वर्षे विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या महाविद्यालयांची यादी:-

| नवीन महाविद्यालय उघडण्याचे ठिकाण | विद्याशाखा | ज्या संस्थेस महाविद्यालय उघडण्याची परवानगी दिली आहे त्या संस्थेचे नांव |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| **मुंबई विद्यापीठ** | | |
| १. भांडूप, मुंबई. | कला व विज्ञान | नॅशनल एज्युकेशन सोसायटी, भांडूप |
| २. मालाड, मुंबई [फक्त मुलींकरिता] | कला व वाणिज्य | राजस्थानी सम्मेलन, मालाड, मुंबई. |
| ३. बांद्रा, मुंबई | कला, विज्ञान व वाणिज्य | सेंट अँड्र्यूज सोसायटी, बांद्रा, मुंबई. |
| ४. जुहु-विलेपार्ले, मुंबई | कला, विज्ञान व वाणिज्य | विलेपार्ले, केळवणी मंडळ, विलेपार्ले, मुंबई. |
| ५. मुलुंड, मुंबई | कला व विज्ञान. | केळकर एज्युकेशन ट्रस्ट, मुलुंड, मुंबई. |
| ६. कळवा, ठाणे | कला, वाणिज्य व विज्ञान | ज्ञान साधना, ठाणे. |
| ७. रसायनी, जि. रायगड. | कला व विज्ञान | डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे. |
| ८. रोहे, जि. रायगड | वाणिज्य | कोकण एज्युकेशन सोसायटी, अलिबाग. |
| **पुणे विद्यापीठ** | | |
| ९. पुणे शहर | वाणिज्य | शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे. |
| १०. येरवडा, पुणे | कला, विज्ञान व वाणिज्य | पिपल्स एज्युकेशन सोसायटी, पुणे |

[आदिवासी क्षेत्रातील महाविद्यालयांकरिता ही विद्यार्थी संख्या कमीत कमी ३० अशी आहे] तरच तो वर्ग १९८३-८४ पासून सुरु करावा तसेच १९८३-८४ या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी होणा-या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परिक्षेत कमीत कमी ३० विद्यार्थी बसले पाहिजेत. [आदिवासी विभागातील महाविद्यालयात कमीत कमी २२].

३. १९८३-८४ हे शैक्षणिक वर्ष सुरु होण्याकरिता आता फारच थोडा अवधी असल्यामुळे विद्यापीठांना अशी विनंती करण्यात येत आहे की, विद्यापीठांच्या कुलगुरुंनी त्यांना असलेल्या कलम ११[४] मधील अधिकाराचा वापर करुन ही महाविद्यालये १९८३-८४ पासून सुरु करण्यास परवानगी द्यावी. त्यानंतर स्थानिक चौकशी समिती, ॲकॅडेमिक कौन्सिल, एक्झिक्युटिव्ह कौन्सिल व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठाकडून शासनाकडे प्राप्त झाल्यावर कलम ४३[६] व [७] यानुसार अंतिम संलग्निकरणाचे आदेश काढण्यास शासनाची आडकाठी नसेल असे गृहित धरण्यात यावे.

४. विद्यापीठांना असेही कळविण्यात येत आहे की, संबंधित संस्थांना महाविद्यालये सुरु करण्याची परवानगी देतांना त्या संस्थांना विद्यापीठाने असे निःसंदिग्धपणे कळवावे की, प्रवेश तथ्या तात्पुरत्या स्वरुपात देवून जर ४० विद्यार्थी प्रवेश घेतील तरच प्रत्यक्षात वर्ग सुरु करावेत. महाविद्यालयाला पुढे देण्यात येणारे संलग्नीकरण, ही अट पूर्ण करण्यावरच अवलंबून राहील अन्यथा महाविद्यालयांना संबंधित विद्याशाखा बंद करावी लागेल. कलम ४३[६] व [७] नुसार संलग्निकरणाचा अंतीम प्रस्ताव शासनाकडे पाठविताना ही अट पूर्ण झाली किंवा नाही याबद्दल प्रस्तावामध्ये उल्लेख करावा अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. पत्राची प्रतिलिपी संबंधित व्यवस्थापनांकडे पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

[ गो० भा० चोरे ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत, सर्व संस्थांचे व्यवस्थापन यांना पाठविण्यात येत आहे. संस्थांना

Principal
... A.M. Patil Arts, Comm. ... N.K. Patil Sci. Sr.